# ऋण निर्देश

प्रस्तुत शोधप्रबंध सादर करतांना मला अतिशय आनंद होतो आहे. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी आदरणीय डॉ. रामचंद्र भालचंद्र देवस्थळी, प्राध्यापक व विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन करुन प्रोत्साहन दिले. मुंबई, पुणे, चेन्नई, नागपूर, बैंगलोर इत्यादी दूरदूरच्या ठिकाणी तज्ञ मार्गदर्शक म्हणून सरांना वारंवार दौऱ्यावर जावे लागत असूनही वेळातवेळ काढून सरांनी मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच मी हा शोध प्रबंध परिपूर्ण करु शकले. या सदिच्छा देणाऱ्या पितृतुल्य गुरुवर्य डॉ. देवस्थळीसर यांची मी सदैव ऋणी राहीन.

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या संदर्भात ताराराणी विद्यापीठाच्या डी. एड्. कॉलेजच्या प्राचार्या सौ मांडरे मॅडम् प्रा. गंगाधरेसर व प्रा. कांबळेसर यांचे मौलिक सहकार्य लाभले. संशोधन सामग्री संकलित करण्याच्या संदर्भात डायट कॉलेजचे प्राचार्य मा. नांगरेसाहेब, प्रा. गायकवाड सर, प्रा. कडसर व प्रा. खुरपेसर यांचेही बहुमोल सहकार्य लाभले. मी त्यांचे ही अत्यंत आभारी आहे.

माझ्या संशोधन प्रबंधाचे कामी माझ्या वहिणी श्रीमती विजयादेवी बाबासाहेब स्वामी यांचे वेळोवेळी प्रोत्साहन मिळाले. तसेच या संशोधन कार्यात सिंहाचा वाटा उचलणारे माझे पती व माझी मुले तसेच माझे वडील यांचेही सक्रिय प्रोत्साहन मिळाले. सुबुक संगणक टंकलेखन करुन देणारे श्री

कैलास काईंगडे यांच्या सहकार्या बध्दल त्यांचे आभारी आहे.

या शोधप्रबंधात पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या गाभामूल्यांचा शोध घेतला असलेने प्राथमिक शिक्षकांना गाभा मूल्याधिष्ठित अध्यापनासाठी हा शोधप्रबंध खूपच उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

सौ. विमल अशोक स्वामी

स्थळ - कोल्हापूर

दिनांक ३०/१२/१९९८